## थोडक्यात

### ‘महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन’वर नाशिकच्या सहाजणांची निवड

**नाशिक** : ‘नाशिक जिल्हा क्रिकेट संघटने’शी संबंधित सहाजणांची ‘महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)’वर विविध महत्त्वाच्या पदांवर निवड झाली आहे. नाशिकचे माजी रणजीपटू सलिल आघारकर यांची ‘महाराष्ट्र रणजी संघा’चे निवड समिती सदस्य म्हणून नेमणूक कायम राहिली आहे. त्याबरोबरच रणजीपटू अमित पाटीलही ‘महाराष्ट्र रणजी संघा’बरोबर राहणार असून त्यांच्यावर क्षेत्ररक्षक प्रशिक्षक या पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. रणजीपटू भगवान काकड हे २३ वर्षांखालील संघाच्या निवड समितीवर नियुक्त झाले आहेत. ‘जिल्हा क्रिकेट असोसिएशन’च्या महिला निवड समितीच्या शर्मिला साळी यांची वरिष्ठ व २३ वर्षांखालील महिला संघाच्या निवड समितीवर नियुक्ती करण्यात आली, तर विनोद यादव यावर्षीदेखील २३ वर्षांखालील संघाचे स्ट्रेंथ आणि कंडीशनींग कोच, तर घनश्याम देशमुख यांची १४ वर्षांखालील मुलांच्या संघाच्या निवड समितीवर नियुक्ती झाली. ‘नाशिक जिल्हा क्रिकेट संघटने’चे चेअरमन विनोद शहा व जिल्हा क्रिकेट संघटनेच्या पदाधिकारी व सदस्यांनी सर्वांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### ‘आयएमए, नाशिक’ शाखेतर्फे पुरस्कारांचे वितरण

**नाशिक** : ‘इंडियन मेडिकल असोसिएशन, नाशिक’ शाखेच्यावतीने डॉक्टर्स डेनिमित्त शालिमार येथील आयएमए हॉलमध्ये नुकताच पुरस्कार वितरण समारंभ पार पडला. यामध्ये डॉ. संजय गणोरकर, डॉ. सुरेश मालेगावकर, डॉ. राजेंद्र शिवदे, डॉ. उमेश तोरणे, डॉ. मिलिंद देशमुख, डॉ. ज्योत्सना पवार यांना २०२५ साठीचे पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला पुरस्कार निवड समितीमध्ये असणारे डॉ. अनिल कासलीवाल, डॉ. रमेश मंत्री, डॉ. आवेश पलोड तसेच डॉ. जयेश पटेल, ‘आयएमए नाशिक’ शाखेचे अध्यक्ष डॉ. निलेश निकम, सचिव डॉ. मनिषा जगताप आदि पदाधिकारी उपस्थित होते. ‘‘ज्येष्ठ डॉक्टरांचा प्रवास रुग्ण व नव्या काळातील डॉक्टर अशा दोन्हींसाठी मार्गदर्शक आहे,’’ असे प्रतिपादन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे यांनी केले. ‘‘वर्षभर करत असलेल्या त्यागाची दखल घेताना डॉक्टरांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा आजचा दिवस आहे,’’ असे डॉ. निलेश निकम प्रास्तविकात म्हणाले.

# ऑगस्टपर्यंत २८ वाहनतळ कार्यान्वित

## शहरातील २२ रस्त्यांवरील, सहा रस्ताबाह्य वाहनतळांसाठी मागवले प्रस्ताव

## वाहतुककोंडीची समस्या टाळण्यासाठी मनपाचा पुढाकार

**नाशिक, दि. ३ : प्रतिनिधी**

शहरातील वाहतुककोंडीवर तोडगा काढण्यासाठी महापालिकेने पावले उचलण्यास सुरुवात केली असून शहरात रस्त्यावरील आणि रस्ताबाह्य अशा २८ वाहनतळांसाठी प्रस्ताव मागविले आहेत. त्यात २२ रस्त्यांवरील, तर सहा रस्ताबाह्य स्वतंत्र वाहनतळांचा समावेश आहे. प्रस्ताव दाखल करण्याची अंतिम मुदत गुरुवार, दि. १० जुलै रोजीपर्यंत असून शुक्रवार, दि. ११ जुलै रोजी ते उघडले जाणार आहेत. ही प्रक्रिया पार पडल्यानंतर ऑगस्टपर्यंत वाहनतळ कार्यान्वित करण्याचे नाशिक मनपाचे नियोजन आहे.

शहरातील वाहतुककोंडीच्या समस्येचा अनेकांना सामना करावा लागतो. त्यामुळे महापालिकेने या समस्येबाबत तत्काळ पावले उचलत वाहनतळाचा प्रश्न सोडविण्याच्या दिशेने अखेर पावले टाकली आहेत. मात्र, स्वतंत्र वाहनतळावर तीनचाकी, चारचाकी वाहनांसाठी निश्चित केलेल्या दरात फारशी तफावत नसल्याने वाहतुककोंडी कितपत दूर होईल, हा प्रश्न आहे. त्यातच आगामी कुंभमेळ्याच्या तयारीला लागलेल्या महापालिकेला वाहतुककोंडीची समस्या सोडविण्यासाठी प्राधान्य द्यावे लागणार आहे. वाहनतळ नसल्याने रस्त्यावर अस्ताव्यस्त वाहने उभी केली जातात. परिणामी लहान-मोठे रस्ते आणि चौकांमध्ये वाहनांच्या रांगा लागतात. त्यामुळे इतर वाहनधारकांना मार्गक्रमण करणे जिकिरीचे ठरते.



### ...असे असतील दर (रुपयांमध्ये)

**रस्त्यावरील वाहनतळ**

| वेळ (तासांत) | दुचाकी | चारचाकी | तीनचाकी |
|---|---|---|---|
| २ | १० | २० | २० |
| २ ते ६ | २० | ४० | ४० |
| ६ ते १२ | ४० | ८० | ८० |
| १२ ते २४ तास | ६० | १०० | १०० |

**रस्ताबाह्य वाहनतळ**


| वेळ (तासांत) | दुचाकी | चारचाकी | तीनचाकी |
|---|---|---|---|
| ६ ते १२ | ३० | १०० | २० |
| १२ ते २४ | ४० | २०० | ५० |

### अनेक वर्षांपासून रखडलेला प्रश्न मार्गी

■ नुकतेच नाशिक जिल्हा दौऱ्यावर आलेले राज्याचे उद्योग आणि शालेय शिक्षणमंत्री वाहतुककोंडीत अडकले होते. तसेच, द्वारका आणि मुंबई नाका येथील अतिक्रमणे व वाहतुककोंडीवरून अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ यांनीही तीव्र नाराजी व्यक्त केली होती. यापूर्वी ‘स्मार्ट सिटी कंपनी’ पैसे देऊन वाहनतळ कार्यान्वित करण्यास अपयशी ठरल्याने त्यास विरोध झाला होता. त्यानंतर आता अनेक वर्षांपासून रखडलेला वाहनतळाचा प्रश्न मार्गी लावण्याची पुन्हा तयारी सुरू झाली आहे.

# दारणा, गंगापूर धरणातून विसर्ग वाढवला

**नाशिक, दि. ३ : प्रतिनिधी**



मागील दोन दिवसांपासून पुन्हा पावसाने जोर धरल्याने धरणांमधील पाणीसाठ्यात चांगलीच वाढ होताना दिसत आहे. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून दारणा आणि गंगापूर धरणांमधून पाण्याच्या विसर्गात वाढ करण्यात आली आहे. गंगापूर धरणातून गोदावरी नदीमध्ये दोन हजार, १३२ क्युसेकने सुरू असलेल्या विसर्गात गुरुवार, दि. ३ जुलै रोजी दुपारी १२ वाजता एक हजार, ५८४ क्युसेकने वाढ करून तो तीन हजार, ७१६ क्युसेक करण्यात आला.

त्याचप्रमाणे दारणा धरणातून दोन हजार, ६९० क्युसेक इतका सुरू असलेल्या विसर्गातही सायंकाळी ६ वाजता एक हजार, ५२४ ने वाढ करून चार हजार, २१४ क्युसेक इतका करण्यात आला. त्याचप्रमाणे द्राक्ष पंढरीसाठी महत्त्वाचे धरण असलेल्या पालखेडमधूनही पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. या धरणामधून एक हजार, ५००, भोजापूरमधून ७६, तर नांदूरमध्यमेश्वर बंधाऱ्यातून १२ हजार, ६२० क्युसेक इतका पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.

‘‘तसेच, यामध्ये गरज पडल्यास वाढ करण्यात येईल,’’ असे नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे यांनी काढलेल्या पत्रकात नमूद करण्यात आले आहे. दारणा नदीपात्रालगतच्या नागरिकांना प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच, नदीपात्रालगत काही तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास त्यांना तत्काळ सुरक्षित ठिकाणी हलविण्यास सांगितले असून नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहे.

# ‘उबाठा’ आणि शरद पवार गटाला मोठा धक्का

**नाशिक, दि. ३ : प्रतिनिधी**



नाशिकमध्ये उबाठा गटासह शरद पवार गटाला मोठा धक्का बसला आहे. गुरुवार, दि. ३ जुलै रोजी मुंबईतील भाजप प्रदेश कार्यालयात नाशिक शहरातील उबाठा गटाचे उपजिल्हा प्रमुख आणि माजी नगरसेवक सचिन मराठे, माजी नगरसेविका डॉ. सीमा ताजणे, माजी नगरसेवक कमलेश बोडके, उपजिल्हा प्रमुख कन्नू ताजणे, माजी नगरसेवक आणि नामको बँकेचे संचालक प्रशांत दिवे यांच्यासह शरद पवार गटाचे गणेश गिते यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. याप्रसंगी राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन, आ. राहुल ढिकले, भाजप प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, ज्येष्ठ नेते बाळासाहेब सानप, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, सुधाकर बडगुजर, मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदि उपस्थित होते.

दुसरीकडे, उबाठा गटाचे उपनेते सुनील बागुल आणि नुकतेच महानगरप्रमुख झालेले मामा राजवाडे यांची उबाठा गटातून हकालपट्टी करण्यात आली आहे. मामा राजवाडे यांच्याऐवजी माजी आ. वसंत गीते यांचे चिरंजीव व माजी उपमहापौर प्रथमेश गीते यांची महानगरप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# सैनिकी मुला-मुलींच्या वसतिगृहात पदभरती

**नाशिक** : सैनिकी मुला-मुलींच्या वसतिगृहात अशासकीय कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरूपात भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. इच्छुक व पात्र माजी सैनिक, वीरपत्नी व इतर नागरिकांनी दि. १५ जुलै रोजीपर्यंत जिल्हा सैनिक कार्यालय, नाशिक येथे अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विलास सोनवणे यांनी केले आहे. सैनिक मुलांच्या वसतिगृहासाठी एक चौकीदार (पुरुष), तीन स्वयंपाकी (महिला) आणि एक सफाई कामगार (पुरुष) अशी पदे आहेत. मुलींच्या वसतिगृहासाठी दोन स्वयंपाकी (महिला), एक सफाई कामगार (पुरुष) आणि एक माळी (महिला) अशी पदे आहेत.

**विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड**

**सीआयएन:** एल२४१००एमएच१९८६पीएलसी०३९८३७
**नोंदणीकृत कार्यालय:** रिजन्ट चेंबर्स, ७ वा मजला, जमनालाल बजाज मार्ग, २०८, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी: २२८२ २७०८/६९८२९०००
**ई-मेल:** cs.vinylchemicals@pidilite.com **वेबसाइट:** www.vinylchemicals.com

**३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि ई-मतदान माहितीसंदर्भात नोटीस**

येथे सूचित करण्यात येत आहे की, विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड कंपनीच्या ३९ व्या एजीएम आयोजनाच्या नोटीसमध्ये नमूद केलेले कामकाज पूर्ण करण्यासाठी (‘‘कंपनी’’) ची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (‘‘एजीएम’’) **बुधवार, ३० जुलै २०२५ रोजी दुपारी ३:३० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (‘‘व्हीसी’’)/अन्य दृकश्राव्य माध्यम (‘‘ओएव्हीएम’’)** याद्वारे होणार आहे. कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय हे सभेचा स्वायत्त स्थळ (डिमड्ड व्हेन्यू) म्हणून राहणार आहे,

कंपनी कायदा, २०१३ (‘‘द अॅक्ट’’) तसेच त्याअंतर्गत जारी केलेल्या नियमांच्या सर्व लागू असलेल्या तरतुदी त्याचबरोबर सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (‘‘सेबी’’) (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ यांच्या एकत्रित वाचनासह कंपनी व्यवहार मंत्रालयाने (‘‘एमसीए’’) ५ मे २०२० रोजी जारी केलेले परिपत्रक क्र. २०/२०२०, २५ सप्टेंबर २०२३ चे परिपत्रक क्र. ०९/२०२३, १९ सप्टेंबर २०२४ रोजी जारी केलेले परिपत्रक क्र. ०९/२०२४, आणि सेबीने जारी केलेले ११ नोव्हेंबर २०२४ चे परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/PoD2/CIR/P/0155 यांच्यासह एमसीए आणि सेबीने जारी केलेली आणि लागू असलेल्या अन्य परिपत्रकांच्या (येथून यापुढे एकत्रितरित्या ‘‘परिपत्रके’’ असे संदर्भित) अनुपालनानुसार व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून कंपनीची एजीएम आयोजित केली जाणार आहे.

वरील परिपत्रकांच्या अनुपालनानुसार, ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करणे तसेच २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी वार्षिक अहवालाची सूचना, ज्या समभागधारकांचे ईमेल पत्ते कंपनीकडे आणि/अथवा डिपॉझिटरी पार्टिसिपंटस (स्) (‘‘डीपी’’) नोंदणीकृत आहेत, अशा सर्व समभागधारकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आलेली आहे. ज्या समभागधारकांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत नाहीत अशा सर्व समभागधारकांसाठी, २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वार्षिक अहवाल पाहण्यासाठी वेबलिंक प्रदान करणारे पत्र टपालाव्दारे पाठविण्यात आलेले आहे.

**दूरस्थ ई-मतदान आणि एजीएमदरम्यान ई-मतदानासाठीच्या सूचना:**

१. कायद्याच्या कलम १०८ मधील तरतुदी आणि अन्य लागू असलेल्या तरतुदींना अनुसरून, जर काही असल्यास, याच्यासह कंपनीज (मॅनेजमेंट अॅण्ड अॅडमिनिस्ट्रेशन) नियम २०१४ चा नियम २० आणि लिस्टींग रेग्युलेशन्सची नियमावली ४४ यांच्या एकत्रित वाचनासह, एजीएममध्ये प्रस्तावित केलेल्या ठरावांवर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी, समभागधारकांना दूरस्थ ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देताना कंपनीला आनंद होत आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीचा वापर करून सभासदांनी मतदान करण्याची आणि ३९ व्या एजीएममध्ये भाग घेण्यासाठी व्हीसी/ओएव्हीएम सुविधेसह एजीएम दरम्यान ई-मतदानाची सुविधा नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडद्वारे (‘‘एनएसडीएल’’) प्रदान केली जाईल.
२. दूरस्थ ई-मतदानाचा कालावधी शनिवार, २६ जुलै २०२५ रोजी सकाळी नऊ वाजता सुरू होऊन मंगळवार, २९ जुलै २०२५ रोजी सायंकाळी पाच वाजता संपणार आहेत. मंगळवार, २९ जुलै २०२५ ला सायंकाळी पाच वाजता दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून मतदान करण्यास परवानगी दिली जाणार नाही. ३९ व्या एजीएममध्ये ई-मतदानाची सुविधा देखील उपलब्ध करून दिली जाईल आणि सभेला उपस्थित असलेले सभासद परंतु यापूर्वी रिमोट ई-व्होटिंगद्वारे आपले मत दिलेले नाही, ते ३९ व्या एजीएमच्यावेळी मतदान करू शकतील.
३. ३९ व्या एजीएममध्ये दूरस्थ ई-मतदान आणि मतदानासाठी सभासदांची पात्रता ठरवण्याची कट-ऑफ तारीख बुधवार, २३ जुलै २०२५ आहे. सभासदांचे रजिस्टर अथवा डिपॉझिटरीजकडून सांभाळल्या जाणाऱ्या लाभार्थी मालकाच्या रजिस्टरमध्ये बुधवार, २३ जुलै २०२५ पर्यंत (‘‘कट-ऑफ तारीख’’) नाव नोंदणीकृत असलेल्या व्यक्तीच दूरस्थ मतदान आणि एजीएमच्या ठिकाणी ई-मतदानाची सुविधा वापरण्यास पात्र राहतील.
४. इलेक्ट्रॉनिक माध्यमातून २०२४-२०२५ आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल पाठवल्यानंतर आणि कट-ऑफ तारखेपूर्वी ज्या सभासदांनी समभाग विकत घेतलेले आहेत, त्यांना विनंती करण्यात येत आहे की, मतदान करण्यासाठी वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड प्राप्त करण्याकरिता अवलंबिल्या जाणाच्या प्रक्रियेसाठी एजीएमची सूचना पाहावी.
५. डीमटेरिअलाइज्ड स्वरुपात, छापील स्वरुपात समभाग धारण करणार्या समभागधारकांसाठी आणि ज्या समभागधारकांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत त्यांच्यासाठी एजीएम आयोजनाच्या नोटीसमध्ये एजीएमदरम्यान दूरस्थ ई-मतदान किंवा ई-मतदानाबाबतच्या सूचना नमूद केलेल्या आहेत. एजीएममध्ये व्हीसी/ओएव्हीएमद्वारे उपस्थित राहण्याच्या सूचना देखील एजीएमच्या नोटीसमध्ये दिलेल्या आहेत.
६. ज्या सभासदांनी रिमोट ई-मतदानाद्वारे आपले मत दिलेले आहे, ते ३९ व्या एजीएममध्ये भाग घेऊ शकतात, परंतु त्यांना पुन्हा त्यांचे मत देण्याचा अधिकार असणार नाही.
७. कंपनीच्या संचालक मंडळाने सराव कंपनी सचिव म्हणून कार्यरत असलेल्या मेसर्स पारीख अॅण्ड असोसिएटसचे श्री. पी. एन. पारीख (सदस्यसंख्या क्र.एफसीएस ३२७, सीपी क्र.१२२८) अथवा त्यांच्या अनुपस्थितीत श्री मितेश धबलीवाला (सदस्यत्व क्रमांक एफसीएस ८३३१, सीपी क्र. ९५११) अथवा त्यांच्या अनुपस्थितीत श्रीमती शर्वरी शाह (सदस्यत्व क्रमांक एफसीएस ९६९७, सीपी क्रमांक ११७१७) यांची निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने ई-मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी छाननीकर्ता म्हणून नियुक्ती केलेली आहे.
८. इलेक्ट्रॉनिक पध्दतीने मतदानाबाबत काही शंका असल्यास, www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावर डाऊनलोड विभागात उपलब्ध असलेले ‘‘फ्रिक्वेन्टली आस्कड् क्वेश्चन्स (एफएक्यूज) फॉर शेअरहोल्डर्स’’ आणि ‘‘ई-व्होटींग युझर मॅन्युअल फ़ॉर शेअरहोल्डर्स’’ याचा कृपया संदर्भ घ्यावा अथवा (०२२) ४८८६ ७००० या क्रमांकावर कॉल करावा अथवा आपली विनंती श्री. अमित विशाल, उप उपाध्यक्ष, एनएसडीएल किंवा पल्लवी म्हात्रे, वरिष्ठ व्यवस्थापक यांना evoting@nsdl.co.in या ई-मेलवर पाठवावी.

३९ वी एजीएम नोटीस आणि आर्थिक वर्ष २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल कंपनीचे संकेतस्थळ www.vinylchemicals.com, तसेच बीएसई लिमिटेड (‘‘बीएसई’’) चे www.bseindia.com, नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (‘‘एनएसई’’) चे संकेतस्थळ www.nseindia.com आणि एनएसडीएलचे संकेतस्थळ www.evoting.nsdl.com यावरसुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

इलेक्ट्रॉनिक स्वरुपात समभाग धारण करणारे आणि ज्यांनी आपला ईमेल अथवा केवायसी तपशील अद्ययावत केलेला नाही, अशा समभागधारकाना त्यांच्या डिपींनी सुचिविलेल्या पध्दतीनुसार त्यांच्या डिमॅट खात्यात सदर तपशीलांची नोंदणी/अद्ययावतीकरण करण्याची विनंती केली जाते. छापील स्वरुपात समभाग धारण करणारे आणि ज्यांनी आपला ईमेल अथवा केवायसी तपशील अद्ययावत केलेला नाही, त्यांनी कंपनीचे रजिस्ट्रार आणि हस्तांतरण प्रतिनिधी, एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीचे लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) यांच्याकडे विहित अर्ज आयएसआर-१ मध्ये सदर तपशीलाची नोंदणी/अद्ययावतीकरण करण्याची विनंती केली जाते. समभागधारक www.vinylchemicals.com वर कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या संबंधित अर्जाचा वापर करू शकतात.

सेबीने १० जून २०२४ रोजी या संदर्भात जारी केलेल्या परिपत्रकाव्दारे नमूद केल्याप्रमाणे, छापील स्वरूपात समभाग धारण करणारे सभासद, ज्यांचे फोलिओ (फोलिओं) कोणत्याही केवायसी तपशीलांसह अद्यावत केलेले नाहीत, जसे की (i) पॅन; (ii) संपर्क तपशील; (iii) मोबाईल क्रमांक; (iv) बँक खाते तपशील आणि (v) स्वाक्षरी, त्यांना १ एप्रिल २०२४ पासून अशा फोलिओच्या संदर्भात लाभांश, व्याज किंवा विमोचन यासह कोणतेही पेमेंट केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच केले जाईल. वरील परिपत्रकानुसार, ज्या छापील फोलिओंबाबत वरीलपैकी कोणताही केवायसी तपशील कट-ऑफ तारखेपूर्वी अदयावत करण्यात आलेला नाही, त्यांच्याशी संबंधित लाभांश कंपनीकडे राखून ठेवला जाईल. सभासदांनी कृपया लक्षात ठेवावे की, फोलिओचे केवायसी तपशील अद्यावत केल्यानंतरच लाभांश त्यांच्या बँक खात्यात जमा केला जाईल.

आगामी एजीएममध्ये समभागधारकांच्या मंजुरीच्या अधीन राहत, कंपनीच्या संचालक मंडळाने त्यांच्या ५ मे २०२५ रोजी झालेल्या बैठकीत, ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी प्रत्येकी १/- (फक्त एक रूपये) रुपये दर्शनी मूल्याच्या समभागासाठी, प्रति समभाग ७/- रुपये (फक्त सात रूपये) एकूण लाभांशाची शिफारस केलेली आहे. लाभांश, जर समभागधारकांनी मंजूर केला तर, ज्या समभागधारकांची नावे रेकॉर्ड तारखेनुसार, म्हणजेच, **मंगळवार, १५ जुलै २०२५** पर्यंत परिस्थितीनुसार सभासदांच्या रजिस्टरमध्ये किंवा लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये नोंद झालेली असतील, अशा समभागधारकांना **सोमवार ४ ऑगस्ट २०२५** रोजी किंवा नंतर दिला जाईल.

**विनाइल केमिकल्स (इंडिया) लिमिटेडसाठी**
सही/-
**आरती फलोर**
**कंपनी सचिव**
**एफसीएस ८७२६**

स्थळ : मुंबई
दिनांक : ३ जुलै, २०२५

# ‘पद्मश्री’ माझ्या एकट्याचा नव्हे, सर्वांचा : चैत्राम पवार

## इंडियन हायस्कूलचा १०३वा वर्धापन दिन व विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहात

**मनमाड, दि. ३ : प्रतिनिधी**



‘‘जंगल, जल, जमीन, गोपालन आणि शेती या पंचसूत्रीवर आधारित आणि वनवासी कल्याण आश्रमाच्या मार्गदर्शनाखाली बारीपाडाच्या नागरिकांनी कामास सुरुवात केली. ४० वर्षांत ८० लाख वृक्षांचे संवर्धन केले. ४८५ बंधाऱ्यांची निर्मिती करून मृदसंधारणाची कामे केली व या मार्फत दोन हजार, ५०० हेक्टर क्षेत्रावरील शेतीचा विकास केला. मला मिळालेला ‘पद्मश्री’ पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून आपल्या सर्वांचा आहे,’’ असे प्रतिपादन ‘पद्मश्री’ पुरस्कार व ‘पहिला महाराष्ट्र वनभूषण पुरस्कार’ प्राप्त सामाजिक कार्यकर्ते चैत्राम पवार यांनी केले.

‘राष्ट्रीय शिक्षण संस्था’ संचलित इंडियन हायस्कूलचा १०३वा वर्धापन दिन व विद्यार्थी गुणगौरव सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. त्यावेळी प्रमुख वक्ते व प्रमुख अतिथी म्हणून पवार बोलत होते.

व्यासपीठावर सोहळ्याचे अध्यक्ष अॅड. किशोर चोरडिया, राजेंद्र गुप्ता, विक्रम सप्रे कुलकर्णी, देवराम सदगीर, विकास काकडे, मोहन गायकवाड, प्रकाश गाडगीळ, रमाकांत मंत्री आदि मान्यवर उपस्थित होते. चैत्राम पवार यांनी आपल्या मनोगतातून गेल्या ४० वर्षांतील प्रवास विशद केला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ईशस्तवन व पर्यावरण गीतावर आधारित नृत्याने सोहळ्याची सुरुवात झाली. प्रास्ताविक व स्वागत मुख्याध्यापक प्रफुल्ल देशपांडे यांनी केले. किशोर चोरडिया यांनी आपल्या मनोगतात चैत्राम पवार यांच्या कार्याचा गौरव करून आपल्या विद्यालयातील विद्यार्थ्यांची सहल बारीपाडा येथे नेण्याचे सूचविले. प्रमुख अतिथींचा परिचय विजया हंडोरे, आभार प्रेमलता गायकवाड यांनी मानले. सूत्रसंचालन हर्षद गद्रे, चेतन सुतार यांनी केले.

### ‘पद्मश्री’ चैत्राम पवार म्हणाले...

“ दापोली व राहुरी कृषी विद्यापीठाच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली शेतीचा विकास करून स्ट्रॉबेरी, कांदा, तृणधान्य आदी पिके घेण्यास सुरुवात केली. या आधी फक्त एकच पावसाळी पीक होणाऱ्या शेतात आज वर्षातून तीन पिके घेतली जातात.

“ रोजगाराच्या संधी गावातच निर्माण झाल्याने परिसरातील नागरिकांचे स्थलांतर बंद होऊन त्यांचे जीवन सुखवस्तू झाले. ४४ ग्रामीण खेड्यांच्या साहाय्याने जवळपास ११ हजार हेक्टरवरील वनक्षेत्राचा विकास केला. त्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.

“ विद्यार्थ्यांच्या वनसहली, पक्षी झाडे यांची नावे जमा करणे, बांध घालून पाणी अडवणे या माध्यमातून ४३५ प्रजातीच्या वृक्षांचे संवर्धन करण्यात आले, तर ४८ प्रकारच्या विविध पक्षांच्या जाती या जंगलात असल्याचे लक्षात आले. झाडे तोडताना, झाडांची मोळी वाहताना दिसल्यास गावामार्फत दंड ठोठावण्यात येऊ लागल्याने आपोआपच वनसंवर्धनाला गती मिळाली.

“ आर्थिकदृष्ट्या सक्षमीकरण करण्यासाठी मोहाच्या झाडाच्या साहाय्याने विविध पदार्थ तयार केले जातात व त्यांच्या विक्रीसाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्यात आली. सुमारे चार हजार, ३५० मोहाची झाडे असून एक झाड वर्षाला लाख रुपयाच्या आसपास उत्पन्न देते. याकरिता एका खासगी कंपनीशी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

“ विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास होण्यासाठी शिक्षकांना शाळेच्या मस्टरबरोबरच गावाच्या मस्टरवर सही करणे बंधनकारक केल्याने शिक्षक शाळेत थांबू लागले. विद्यार्थ्यांना शाळेत पाठवणे बंधनकारक करण्यात आले, त्यामुळे शैक्षणिक दर्जा सुधारून आज अनेक विद्यार्थी उच्चविद्याविभूषित आहेत.

# शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणासाठी सरसावली मनपा

## शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विशेष शोध मोहिमेचा शुभारंभ

**नाशिक, दि. ३ : प्रतिनिधी**

शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी महापालिकेने विशेष शोध मोहीम हाती घेतली आहे. दि. १ जुलै ते दि. १५ जुलै रोजीदरम्यान महापालिका शिक्षण विभाग शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित मुलांचा शोध घेऊन त्यांच्यासाठी शिक्षणाची दारे उघडी करून देणार आहे. या उपक्रमाचा शुभारंभ श्रमिकनगर, जेलरोड, नाशिकरोड येथे विभागीय शिक्षण उपसंचालक संजयकुमार राठोड यांच्या उपस्थितीत व शिक्षणाधिकारी डॉ. मिता चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली नुकताच करण्यात आला.

शिक्षणहक्क कायद्यानुसार सहा ते १४ वयोगटातील कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये, हा या शोध मोहिमेचा उद्देश आहे. तसेच, मोहिमेदरम्यान काही स्थलांतरित कामगारांच्या वस्त्यांमध्ये शाळाबाह्य दोन मुले व एक मुलगी आढळून आली. त्यांना साने गुरुजी प्राथमिक विद्यालय, मनपा शाळा क्र. ५६ येथे तत्काळ दाखल करण्यात आले. त्यांच्या पालकांशी संवाद साधून त्यांना शाळेचे महत्त्व पटवून देण्यात आले. या मोहिमेअंतर्गत शाळा क्र. ५६, जेलटाकी परिसरातील कॅनॉल रोड, झोपडपट्टी, इंदिरानगर, श्रमिकनगर, भगवा चौक, ट्रॅक्शनरोड या भागात प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले.

यावेळी शाळेच्या विद्यार्थिनींनी शाळाबाह्य विद्यार्थ्यांमध्ये जागृती घडवण्यासाठी वाद्य संगीत, गीत सादरीकरण व पथनाटिका सादर केली. या उपक्रमात मुख्याध्यापक व पर्यवेक्षक वसंत विसपुते, विशेष तज्ज्ञ प्रल्हाद हंकारे, शिक्षक किसन अहिरे, सुनीलकुमार मगर, अनिल चव्हाण, स्मिता मेतकर, जाकैया मुलानी, शिल्पा वावरे, संजय वैष्णव, अजय जाधव, अशोक हिरे, आदि उपस्थित होते.



### शिक्षणापासून कोणीही वंचित राहणार नाही

“ समाजात शैक्षणिक जागरूकता वाढवण्यासाठी आणि सर्व मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सातत्याने असे उपक्रम राबविले जात आहेत. कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही, यासाठी शक्य तेवढे प्रयत्न केले जातील.

**– संजयकुमार राठोड,** विभागीय शिक्षण उपसंचालक